यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - 422 222
Ph.- 0253-2231714-15, Fax- 2231716, E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

जावक क्र. परीक्षा/नोव्हेंबर-2018/2363 दिनांक - 24.09.2018

पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी - परीक्षा अर्ज भरण्याबाबतच्या महत्त्वाच्या

१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शालेय व्यवस्थापन पदविका (P10), बी.ए.(G01/G12/G11/G29/G64/G21/G26), बी.कॉम (G02), बी.एड.(P01/P80) इत्यादी शिक्षणक्रमांची पुरवणी परीक्षा नोव्हेंबर - 2018 मध्ये आयोजित करण्यात येत आहेत. वरील शिक्षणक्रमांच्या परीक्षेचे वेळापत्रक हे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑक्टोबर 2018 च्या दुसऱ्या आठवड्यात उपलब्ध होईल.

२) 16 अंकी कायम नोंदणी क्रमांक असलेल्या सर्व पुर्नपरीक्षार्थींनी संबंधित शिक्षणक्रमांच्या परीक्षेसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज **दिनांक 24.09.2018 ते 15.10.2018** या कालावधीतच भरावयाचा आहे. यानतंर मुदतवाढ तसेच विलंब शुल्क राहणार नाही.

३) सर्व शिक्षणक्रमांच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांना लेखी/प्रात्यक्षिक परीक्षेसाठी रू.500/- परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे. एक किंवा त्यापेक्षा अधिक अभ्यासक्रम (विषय) असले तरीही प्रत्येक पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी म्हणून एकरकमी रू.500/- परीक्षा शुल्क भरावे लागेल. यात अभ्यासक्रमाची (विषयाची) अट असणार नाही. ऑनलाईन परीक्षा अर्ज भरतांना Debit Card / Credit Card/ Net Banking इत्यादी मार्फत परीक्षा शुल्क भरता येईल.

४) ज्या विद्यार्थ्यांचा नोंदणीचा विहित कालावधी संपलेला असेल अशा नियमांच्या अधिन राहून अशा विद्यार्थ्यांनी प्रथम पुर्ननोंदणी केल्यानंतरच ऑनलाईन परीक्षा अर्ज भरावा. पुर्ननोंदणी न करता परीक्षा अर्ज भरल्यास अशा विद्यार्थ्यांना परीक्षेस पात्र धरले जाणार नाही.

५) पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी संख्येचा विचार करून व विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षा देणे बंधनकारक राहील परीक्षाकेंद्रांची यादी ऑक्टोबर 2018 च्या शेवटच्या आठवड्यात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

६) परीक्षेस पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश-पत्र (हॉलतिकिट) कसे डाऊनलोड करावे याच्या सूचना संकेतस्थळावर नोव्हेंबर 2018 च्या पहिल्या आठवडयात उपलब्ध होतील. हॉलतिकिटाशिवाय कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्याला परीक्षा देता येणार नाही. अपात्र विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज भरू नये व परीक्षेलाही बसू नये.

७) परीक्षेला येतांना स्वतःचे हॉलतिकिट व ओळखपत्र बरोबर आणावे अन्यथा परीक्षेला बसता येणार नाही.

८) परीक्षा चालू असतांना विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रमाचे अध्ययन साहित्य, कागदपत्रे, **मोबाईल अथवा कॉपी बरोबर आणू नये.** परीक्षेत कॉपी करतांना आढळल्यास अथवा उत्तरपुस्तिका तपासतांना कॉपी केल्याचे परीक्षकांना आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९) प्रत्येक विद्यार्थ्याने परीक्षेच्या अद्यावत माहितीसाठी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ वेळोवेळी पहावे.

सर्व परीक्षार्थी, अभ्यासकेंद्र आणि विभागीय केंद्र यांनी वरील सूचनांची नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक

प्रत -1) सर्व अभ्यासकेंद्र - मा.केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक, यांना विनंती करण्यात येते की, सदरचे सूचनापत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या वर नमुद केलेल्या शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

2) सर्व विभागीय केंद्र - मा. विभागीय संचालक, यांना विनंती करण्यात येते की, सदरचे सूचनापत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अभ्यासकेंद्रांच्या निदर्शनास आणून द्यावे.

3) सहा.कुलसचिव, परीक्षा -1 4) प्रमुख, संगणक कक्ष 5) प्रमुख, एम.के.सी.एल.